# महाराष्ट्र शासन - आरोग्य सेवा
# (जाहिरात)

जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्रातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१(भाग-१)/सेवा-३, दि.०३/१२/२०१८ अन्वये मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली कंत्राटी पद्धतीने एम.बी.बी.एस. अर्हताधारकामधून भरावयाची असून विहीत शैक्षणिक अर्हताधारक उमेदवारांनी खालील अटीच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात येत असून उमेदवारांनी सदरचे अर्ज संबंधित जिल्ह्यामधील जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ या कार्यालयामध्ये सादर करावीत, उपलब्ध रिक्त भरावयाच्या पदांची माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | जिल्हा | भरावयाची पदे | वेतन |
|---|---|---|---|
| १ | यवतमाळ | १७ | **आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या एम.बी.बी.एस. पात्रता धारकांना दरमहा रु. ८०,०००/- व इतर भागात काम करणाऱ्या एम.बी.बी.एस. (M.B.B.S.) अर्हताधारकांना रु. ७५,०००/- इतके एकत्रित मानधन दिले जाईल.** |
| | एकूण | १७ | |

टीप : सदर जाहिरातीमधील पदसंख्या कमी/जास्त होऊ शकतात. याबाबतचे संपूर्ण अधिकार मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीला आहेत. मुलाखतीची तारीख जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे**

१) पदाचे नाव : कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म.वै.आ.से. गट-अ

२) शैक्षणिक अर्हता - अ) एम.बी.बी.एस. अर्हता

३) वयोमर्यादा - जाहिरात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून वय ५५ वर्षेपेक्षा जास्त नसावे.

४) अर्ज सादर करण्याचा कालावधी दिनांक १९/०१/२०२६ ते २८/०१/२०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत पोष्टाने अथवा समक्ष नमूद कागदपत्राच्या प्रतिसह सादर करावेत. कागदपत्राच्या प्रती सोबत सादर करताना सदर प्रती स्पष्ट असावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

५) अर्ज सादर करावयाचे ठिकाण - जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जि.प. यवतमाळ कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत सादर करावे.

**स्पष्टीकरण -** कंत्राटी तत्त्वावर काम करीत असताना कोणत्याही प्रकारे भविष्यात कायमस्वरूपी अथवा नियमित नेमणूक मिळणार नाही व उमेदवाराने तसे गृहित धरू नये अथवा कंत्राटी नियुक्तीवरील उमेदवार तसा हक्क मागू शकणार नाही. नियमित सेवेतील उमेदवार उपलब्ध झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सेवा समाप्त करण्यात येतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. मुलाखती दिलेल्या व निवड झालेल्या उमेदवारांना जिल्ह्यांतर्गत कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्रात तेथील निकड लक्षात घेऊन वैद्यकीय अधिकारी गट-अ या कंत्राटी तत्त्वावर ११ महिन्यांसाठी नेमणूक दिली जाईल. याकरिता इच्छुक उमेदवारांनी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडे दिलेल्या विहित वेळेमध्ये अर्ज सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडून जेव्हा उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आल्यानंतर सदर दिवशी उमेदवारांनी मूळ शैक्षणिक व इतर आवश्यक दस्ताऐवजासह / प्रमाणपत्रासह प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक राहील. आदिवासी व दुर्गम भागात काम करणार्या एम.बी.बी.एस. पात्रताधारकांना दरमहा रु. ८०,०००/- व इतर भागात काम करणाऱ्या एम.बी.बी.एस. अर्हताधारकांना रु. ७५,०००/- इतके एकत्रित मानधन दिले जाईल.

टीप १ : अर्जासोबत फोटो, शैक्षणिक अर्हता (सर्व वर्षाचे गुणपत्रिका) प्रयत्न प्रमाणपत्र, वयासंबंधी दाखला, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे / भारतीय वैद्यक नोंदणी प्रमाणपत्र, आंतरवासीयता प्रमाणपत्र, असल्यास अनुभव प्रमाणपत्र (शासकीय स्तरावर काम केल्याबाबतचा अनुभव आवश्यक आहे) तसेच मागासवर्गीय असल्यास तत्संबंधी जातीचा दाखला, जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र साक्षांकित देणे आवश्यक राहील. (वरील सर्व कागदपत्राच्या प्रती स्पष्ट असाव्यात याची नोंद उमेदवारांनी घ्यावी.)

टीप २ : नियुक्तीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी अर्जासह टीप-१ मध्ये नमूद केलेल्या संपूर्ण कागदपत्राच्या साक्षांकित छायाप्रतीचे संचासह व मूळ कागदपत्रासह सादर करावा व जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आलेल्या दिवशी मुलाखतीस वेळेवर हजर राहणे आवश्यक आहे. विलंबाने हजर होणाऱ्या उमेदवारांचा मुलाखतीकरिता विचार केल्या जाणार नाही.

टीप ३ : उमेदवारांनी मुलाखतीचे दिवशी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयामध्ये मूळ प्रमाणपत्रासह त्यांनी कळविलेल्या दिनांकाला हजर राहणे आवश्यक राहील. संबंधित जिल्ह्याचे मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीचा निर्णय अंतिम राहील.

टीप ४ : मुलाखतीचे दिनांक / वार ठरविणे अथवा त्यामध्ये बदल करणे, मुलाखत प्रक्रिया रद्द करणे, रिक्त पदामध्ये बदल करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीला राहील.

टीप ५ : वर्षभरात रिक्त होणाऱ्या पदावर उपलब्ध पदाप्रमाणे प्रतीक्षा यादीतील गुणानुक्रमे उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

**(डॉ. सुभाष श. ढोले)**

**जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ**

Mahabharti.in